# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१३/२०२२** **दिनांक २१.११.२०२२**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ३.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व १००/२०२१ (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दि.२१/११/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.स्वीस/४१/२०२२, जिल्हा न्यायालय,अहमदनगर दिनांक १५ नोव्हेंबर,२०२२ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दि.२१/११/२०२२ रोजी दुपारी ३.०० वा. साई निवास अतिथीगृह येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वतीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी सभेकरीता उपस्थित होते.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

- **मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
  **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
  **अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

- **मा.डॉ.राजेंद्र भोसले, भा.प्र.से.**
  **जिल्हाधिकारी अहमदनगर तथा**
  **सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

- **मा.श्री.राहूल जाधव,**
  **उप मुख्य कार्यकारी अधिकारी,**
  **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

**तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी दि.१५.११.२०२२ चे पत्रान्वये समितीची बैठक आयोजित करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सुचना दिली. त्या पत्रासोबत एकुण ४५ विषयांची सुची दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.१७.११.२०२२ चे पत्रान्वये ३९ विषयांची त्यांनी तयार केलेली सुची पाठविली. अध्यक्ष यांनी दि.१९.११.२०२२ चे पत्रान्वये मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी पीआयएल क्र.१९८/२०२१ व सीए नं.११९७३/२०२१ मध्ये दि.१३.९.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशातील परिच्छेद क्र.182(d) प्रमाणे अध्यक्ष यांनी पाठविलेल्या विषयसुचीप्रमाणे समितीची बैठक आयोजीत करण्याचे निर्देश आहेत. दि. २०.११.२०२२ चे उत्तरात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व्यवस्थापन समितीची कार्यपध्दती आणि तिचे कामकाज चालविणे नियम-२०१३ मधील विनियम-३ चा उल्लेख करुन विशेष सभा बोलविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, अध्यक्षांशी सल्लामसलत करुन विशेष सभा बोलावू शकतात व त्यासाठी किमान तीन दिवसांची अलग नोटीस देणे**

आवश्यक आहे आणि त्यामुळे यापुढे विषयसुची तयार करतांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी सल्लामसलत करुन आयोजन केल्यास सोईचे होईल, असा उल्लेख केला. सोबतच २१.११.२०२२ रोजी त्यांनी पाठविलेल्या विषयसुचीप्रमाणे अजेंडयानुसार विषय चर्चेसाठी घेण्यात यावे अशी विनंती केली. आज मुख्य कार्यकारी अधिकारी सभेसाठी उपस्थित राहिल्या नाहीत. त्यांचे मत यापुर्वी उल्लेख केल्याप्रमाणे विषयसुची मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सल्लामसलत अनुसारच तयार व्हायला पाहिजे असे मांडले आहे.

अध्यक्ष यांनी असेही मत मांडले की, तदर्थ समितीची मागील सभा झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तातडीचे विषय म्हणून ३ विषय चक्रिय पध्दतीने अध्यक्ष यांचेकडे पाठविले. दि.२.११.२०२२ रोजी आयोजित समितीचे सभेस मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहिलेल्या नाहीत. त्या बैठकीत काही विषय आवश्यक कागदपत्रे समितीस सादर न केल्यामुळे निर्णीत करता आले नाहीत. संस्थानचे दैनंदिन कामकाजासाठी लागणारे साहित्य, विशेषत: महत्वाचे तुप खरेदी अत्यंत तातडीचा विषय आहे म्हणून पुर्वीचे बैठकीत विषय मांडण्यात आला. त्यावर चर्चा करुन तात्पुरती व्यवस्था म्हणून त्या निर्णयात नमूदप्रमाणे पुढील सभेत नियमानुसार ठेवण्यास सांगितले. औषध खरेदीचा विषय देखील प्रलंबीत आहे, लेखन सामग्री व इतर वस्तु साहित्य इतर वस्तु खरेदी करण्यासाठी जीईएम रजिस्ट्रेशन करुन घेण्यास सांगीतले त्यानुसार पुढील कार्यवाही प्रशासनाने केली नाही. या सर्व तातडीच्या विषयांचे पार्श्वभूमीवर आजची सभा बोलविण्यात आली होती.

आजचे सभेस देखील मुख्य कार्यकारी अधिकारी अनुपस्थित राहणार असल्याची माहिती व त्यांचे ऐवजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राहूल जाधव यांना, त्यांनी प्राधिकृत केल्याचे पत्र अध्यक्ष यांना पाठविले. सदरचे पत्रावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयाचा जावक दिनांक १९.११.२०२२ आहे व सदरचे पत्र अध्यक्ष यांना ई-मेलव्दारे दि.२१.११.२०२२ रोजी सकाळी १०.५७ वा. पाठविले आहे. या पत्रात नमुद केले आहे की, पुर्व नियोजीत कामासाठी दिल्ली येथे जाणार असल्याने आजच्या सभेस उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. सभेची आजची तारीख दि.१६.११.२०२२ चे पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविण्यात आलेली आहे, असे अध्यक्ष यांनी मत मांडले.

वरील अध्यक्ष यांचे सर्व मताशी समिती सदस्य मा.डॉ.राजेंद्र भोसले यांनी संपुर्ण सहमती दर्शविली.

तदर्थ समितीचे सदस्य व जिल्हाधिकारी मा.डॉ.राजेंद्र भोसले यांनी असे मत मांडले की, उपरोक्त विनियम क्र. ३ चे अवलोकन करुन सदर विनियम क्र.३ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जर विशेष सभा बोलावयाची असल्यास त्यासाठी ही कार्यपध्दती लागू राहील आणि आजची सभा, मागील सभेमध्ये विषय राहिले त्याला अनुसरुन नियमीत सभा बोलाविल्यामुळे सदर विनियम लागू नाहीत.

तदर्थ समिती ही अधिनियमातील कलम ५ नुसार स्थापीत केलेली नाही. मा.उच्च न्यायालयाने उपरोक्त आदेशान्वये स्थापित केलेली आहे. त्यात बैठक कोणी बोलवायची आणी विषयसुची कोण विहीत करणार आहे याबद्दल मा.उच्च न्यायालयाचे आदेशात नमुद करुन केलेली तदर्थ समिती आहे. म्हणून सदर विनियम लागू नाहीत.

अधिनियमाचे कलम १४ प्रमाणे समितीचे निर्णयांची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे दैनंदिन कामात देखील व्यत्यय येत आहे. ही सर्वसाधारण जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. कामकाज फक्त चक्रिय पध्दतीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे विनंतीवरुन समिती आपले कर्तव्य पार पाडू शकत नाही. दि.२.११.२०२२ रोजीचे सभेस मुख्य कार्यकारी अधिकारी अनुपस्थित होत्या. .दि.३.११.२०२२ ला मुंबई येथे मंत्रालयात बैठकीस उपस्थित राहण्यासाठी दि.२.११.२०२२ लाच जायचे आहे, असे कारण दाखवून अनुपस्थित राहिल्या.

**उपरोक्त पार्श्वभूमीवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नियमीत सभेत व्यवस्थापन समितीचे कामकाज चर्चेसाठी ठेवून निर्णय करुन घेण्यापेक्षा चक्रिय पध्दतीने विषय पाठवून समितीचे कामकाजापेक्षा इतर कामकाजांना महत्व दिले आहे असे दिसून येते. या प्रमाणे समितीचे सदस्य मा.डॉ.राजेंद्र भोसले यांनी मत मांडले. या मताशी अध्यक्ष संपुर्णपणे सहमत आहे.**

**मा.उच्च न्यायालयाचे आदेशातील परिच्छेद क्र. 182(c) मध्ये संस्थानचे कामकाजाचे पर्यवेक्षण, देखरेख आणि कारभार पाहणे ही जबाबदारी तदर्थ समितीला दिली आहे. तसेच परिच्छेद क्र.182(f) नुसार मा.उच्च न्यायालयाचे परवानगीशिवाय मोठया रकमेचे आर्थिक निर्णय समितीने घेऊ नयेत असेही आदेश दिले आहेत.**

**परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी ज्या स्वत: समितीचे कामकाज सदस्य सचिव म्हणून करुन घेण्यासाठी जबाबदार आहेत. त्या गैरहजर राहिल्या. समितीची निर्णयाची अंमलबजावणी करण्याची टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आले आहे. एकंदरीतच मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियमानुसार कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याकडे कल दिसुन येत नाही. असे अध्यक्ष व समिती सदस्यांचे ठाम मत आहे व संस्थानचे उद्देशाचे दृष्टीने ही बाब गंभीर व हानीकारक आहे.**

**शेवटी मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार समितीचे अध्यक्ष तथापी प्रमुख संस्थानचा कारभार सुरळीत चालविण्यासाठी गरजेचे असल्याने जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचेकडील दि.१९.११.२०२२ चे पत्रानुसार विहीत केलेल्या विषयसुचीप्रमाणे खालील विषय चर्चेसाठी घेण्यात येतील. या मध्ये भक्तांच्या सोई व सुविधेसाठी व कल्याणासाठी जे तातडीचे विषय आहेत ते चर्चेला घेण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये साई संस्थान प्रसादालयास, हॉस्पिटलसाठी आवश्यक साहित्य हे अत्यंत तातडीचे विषय असल्यामुळे ते प्रथम चर्चेसाठी घेण्याचा निर्णय एकमताने झाला.**

---

**विषय नं.१** — **दि.०२.११.२०२२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५९९** — **दि.०२.११.२०२२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ समिती सभेचे इतिवृत्तामध्ये खालील प्रमाणे दुरुस्त्या करुन करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

निर्णय क्र.५६४- साई धर्मशाळा इमारतीचे बांधकाम ११ वर्षापुर्वी झाल्यामुळे दुरुस्ती होणे अपेक्षीत आहे त्यासाठी संबधीत देणगीदार श्री.के.व्ही.रमणी हे जर सदर काम देणगी म्हणून करुन देण्यास तयार असतील तर त्यांचेकडून ते काम करुन घेता येईल. ते तयार नसतील तर अंदाजपत्रक तयार करुन घ्यावे त्यानंतर मग प्रस्ताव सादर करण्यात यावा. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

**या ऐवजी खालील प्रमाणे वाचावे.**

**निर्णय क्र.५६४- साई धर्मशाळा इमारतीचे बांधकाम ११ वर्षापुर्वी झाल्यामुळे दुरुस्ती होणे अपेक्षीत आहे त्यासाठी संबधीत देणगीदार श्री.के.व्ही.रमणी हे जर सदर काम देणगी म्हणून करुन देण्यास तयार असतील तर त्यांचेकडून ते काम करुन घेता येईल. ते तयार नसतील तर त्यांचेकडूनच अंदाजपत्रक तयार करुन घ्यावे जेणे करुन वस्तुनिष्ट अंदाजपत्रक तयार होईल व त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात यावा.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

विषय नं.२ चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या विषयावरील निर्णय वाचून कायम करणे.

१. आयकर कायद्यातील तरतुदीन्वये सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.

निर्णय क्र.६००/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही–लेखाशाखा)

---

२. आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६००/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही–लेखाशाखा)

---

३. एल.ए.आर. नंबर २०/२०१२, २१/२०१२,२२/२०१२, ३२/२०१२, ३३/२०१२, ३४/२०१२, ३५/२०१२, ३६/२०१२, ३७/२०१२, ३८/२०१२, ३९/२०१२, ०३/२००४, ४/२००४ व ०५/२००४ या भूसंपादन प्रकरणातील धनको यांनी दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, राहाता यांचेमार्फत प्रस्ताव सादर केला की, त्यांना शिर्डी नगर पंचायत, शिर्डी यांचेकडून घेणे असलेली रक्कम दिनांक ३१/०१/२०२३ पर्यंत, त्यांनी यापुर्वी दिनांक ११/१२/२०२१ रोजीचे लोकअदालत साठी दिलेल्या प्रस्तावाप्रमाणे मिळत असेल तर त्यांना सदरहु प्रस्ताव आजही मान्य आहे, याबाबत निर्णय घेणे.

निर्णय क्र.६००/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली व सदर लोकअदालतीचे निर्णयाचे मा.उच्च न्यायालयात तातडीने सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे. व मुदतीच्या आत कार्यवाही करावी. अन्यथा संस्थानला जादा व्याजाची रक्कम भरावी लागेल. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.३ संस्थानचे मंदिर, प्रसादालय व लाडू निर्मिती विभागांसाठी गाईचे शुध्द तुप खरेदीकामी सद्यस्थिती व पुढील आवश्यक तुपाचे नियोजनाबाबत.

निर्णय क्र.६०१ प्रस्ताव आणि प्रस्तावासोबत निविदेचा मुसदा सादर केला आहे. सदर प्रस्तावात किंवा निविदेच्या मसुदयामध्ये आयएसआय (ISI) १६३२६:२०१५ प्रमाणे मानकांचा उल्लेख नाही. समितीचे सदस्य मा.डॉ.भोसले साहेब यांनी ही गोष्ट लक्षात आणून दिली. यापुर्वीचे दि.१८.१०.२०२२ चे निर्णयात मानकांचा उल्लेख नाही ही गोष्ट नमुद केली होती. आजचे सभेत या चर्चेचे वेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जाधव, प्रशासकीय अधिकारी श्री.किसवे, खरेदी अधिकारी श्री. दिपक थोरात यांना स्विस चॅलेंज पध्दत आणि आयएसआय (ISI) १६३२६:२०१५ प्रमाणे निविदा मागवितांना किंवा अभिव्यक्ती स्वारस्य बोलवतांना मानकांचा उल्लेख करणेबाबत आवश्यक बाबींचा उल्लेख करणे आवश्यक असुनही केले नसल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यामुळे तुप खरेदीवर निर्णय घेता येणार नाही. यावर उपस्थित अधिकारी यांनी संभ्रम असल्याचे कथन केले. त्यावर सभेमध्ये समितीचे सदस्य मा.डॉ.राजेंद्र भोसले यांनी आयएसआय मानकांचे बाबतीत भारतीय मानक संस्था, पुणे येथील शास्त्रज्ञ यांचे मार्गदर्शन मोबाईल फोनवर स्पिकर ऑन करुन

सर्वांना मिळवून दिले. त्यास मानकांबद्दलचा संभ्रम दुर झाल्याचे उपस्थितांनी मान्य केले. तदनंतर कर्नाटका मिल्क को.ऑप. फेडरेशनचे डायरेक्टर मार्केटींग यांचेशी देखील मोबाईल फोनवर स्पिकर ऑन करुन त्यांचे संस्थेकडून तुपाचा पुरवठा होऊ शकतो का आणि दर काय राहिल याबद्दल माहिती मिळवून दिली. त्यांनी माहिती दिली की, टीटीडी (तिरुमला तिरुपती देवस्थान) यांना पुर्वी तुपाचा पुरवठा केला आहे, अशी माहिती दिली. अभिव्यक्ती स्वारस्य व स्विस चॅलेंज पध्दतीने तुपाचा दर पाठविण्यासाठी ई-मेलव्दारे पाठविण्यास सांगीतले, त्याप्रमाणे त्यांना पत्र पाठविण्यात यावे. उपरोक्त आयएसआय स्टॅन्डर्ड ग्रेड-१, ग्रेड-२ व ग्रेड-३ चा उल्लेख असावा. त्यात पुरवठा केलेल्या तुपाचे पेमेंट ३० दिवसाचे आत होईल असा उल्लेख करावा. या शिवाय आणखी निविदा किंवा अभिव्यक्ती स्वारस्य पत्रामध्ये कोणकोणत्या गोष्टीचा उल्लेख असावा याची माहिती समाविष्ठ करण्यासाठी माहिती घेण्याकरीता हेरिटेज कंपनी हैद्राबाद यांचे प्रसिडेंड यांचेशी स्पिकर ऑन करुन मोबाईल फोनवर अध्यक्ष यांनी बोलुन माहिती घेतली. संस्थानचे दर्जानुसार तुपाचा पुरवठा करण्यास त्यांनी उत्सुकता दाखविली. अमुल (AMUL) डेअरीचे झोनल ऑफिसर यांचेशी मा.सदस्य डॉ. राजेंद्र भोसले यांनी देखील माहिती घेतली.

गोवर्धनचे उच्च पदस्थ यांचेशी मा.सदस्य डॉ. राजेंद्र भोसले यांनी मोबाईल फोनवर स्पिकर ऑन करुन तुप खरेदीचे प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविण्यासाठी आवाहन केले त्यास त्यांनी सहमती दर्शविली.

भारतीय मानक संस्था, पुणे येथील शास्त्रज्ञ यांनी असे म्हटले की, आताचे ई-निविदेतील मानके चुकीची आहेत. जर तुम्हाला ग्रेड-१ चे तुप पाहिजे असेल तर आम्ही तुम्हाला बरोबर मानके सांगु शकतो. तेव्हा तयार केलेल्या ई-निविदेचा मसुदा त्यांना ई-मेलवर पाठवून त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे ई-निविदेचा मुसदा तयार करण्यात यावा व प्रस्ताव मंजूरीसाठी तातडीने म्हणजे दि.२६ नोव्हेंबर,२०२२ पुर्वी पाठवावा. मुदतीत प्रस्ताव न पाठविल्यास जबाबदारी निश्चीती केली जाईल.

वरील सर्व गोष्टी आणि अशाच पध्दतीने इतर कामे उत्तम रितीने पार पाडण्यासाठी पुर्ण कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक केलेली असतांना मा.जिल्हाधिकारी व मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांची नेमणूक तदर्थ समितीमध्ये सदस्य व अध्यक्ष म्हणून केल्यामुळे उपरोक्त सर्व गोष्टीची माहिती घेऊन समितीसमोर रितसर प्रस्ताव सादर करुन मंजुर करुन घेण्याऐवजी समितीने निर्णय दिल्यानंतरही समितीच्या निर्णयाचे पालन न करता पुन्हा त्याच विषयावर समितीला जणू पुर्णवेळ कार्यकारी अधिकारी समजुन काम करावे लागत आहे. याच विषयावर उपरोक्त कार्य करण्यासाठी तीन तासाचा वेळ खर्ची पडला आहे.

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

**विषय नं.४** दि.२६.०८.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**विषय नं.५** दसरा उत्सव २०२२ साजरा करणेस व याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता या विषयाची माहिती याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र जा.नं.एसएसएस/ मुकाअ/ २९८२/ २०२२, दि.०१/११/२०२२ अन्वये केलेला खुलासा, दसरा उत्सव-२०२२ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता या विषयासह समितीचे विचारार्थ ठेवणे.

**विषय नं.६** श्री साईनाथ रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी आर.एम.ओ. म्हणून नेमलेले व कंन्सल्टंट डॉक्टरांचे काम करत असलेले वैद्यकीय अधिकारी यांचे बाबत.

| | |
|---|---|
| विषय नं.७ | वाहन विभागातील वापरास योग्य असलेल्या परंतु वापरात नसलेल्या १५ बसेस बाबत दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९३ नुसार माहिती. |
| विषय नं.८ | संस्थानच्या मालमत्ता व दायित्व, सध्या चालू असलेल्या भरती प्रक्रिया, खरेदी प्रक्रिया, संस्थानकडून देणे थकबाकी इत्यादीबाबत दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९५ नुसार माहिती. |
| विषय नं.९ | पुजारी, उप पुजारी, विनावादक, तबला वादक इत्यादि भरती प्रक्रियेबाबत दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९५ नुसार माहिती. |
| विषय नं.१० | संस्थानचे दोन्ही हॉस्पीटलसाठी लागणारे औषधे, शिल्लक साठा, आवश्यक खरेदी व खरेदीच्या प्रक्रियेची सद्यस्थिती याबाबत औषध खरेदी निविदेचा मसुदा दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९६ नुसार मान्यतेबाबत. |
| विषय नं.११ | संस्थान कर्मचा-यांना गणवेष–पूर्वीची व नंतरची निविदा व निर्णयाबाबत दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९७ नुसार माहिती. |
| विषय नं.१२ | रविवार, गुरुवार व इतर दिवशी राखीव ठेवलेल्या शॉल्सबाबत दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५९८ नुसार माहिती. |
| विषय नं.१३ | श्री साईबाबा महाविद्यालय–सहाय्यक प्राध्यापक (Ad-hoc) भरती करिता जाहिरात बाबत. |
| विषय नं.१४ | संस्थानचे कायम व कंत्राटी कर्मचा-यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत. कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील सर्वकष प्रस्तावाबाबत. |
| विषय नं.१५ | मौजे शिर्डी ता.राहाता येथील सि.स.नं ९३ क्षेत्र ९३.७ चौ.मी.या श्री व्दारकामाई मंदिराचे दक्षिण बाजूकडील मिळकत व मोकळी जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नावे होणेबाबत प्रस्ताव, प्लॅन व संबंधीत दस्तऐवज, त्याकामी इच्छूक देणगीदार या सर्व माहितीसह विचार करणे. |
| विषय नं.१६ | आयकर विभागाच्या रु.४९८ कोटी कर भरणा नोटीसा तसेच आयकर विषयक कामकाजाची सद्यस्थिती बाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचा निर्णय क्र.५२७ च्या कार्यवाहीचे अवलोकन होणेबाबत. |
| विषय नं.१७ | सन २०२३-२४ या वर्षाकरिता एल.आय.सी.ग्रुप ग्रॅज्युईटी इन्शुरन्स स्कीम सह इतर शासकीय स्कीम याबाबत समितीस अवगत करणे. |
| विषय नं.१८ | संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने चांदी वस्तुंची कस लावून तपासणी करुन बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणेकामी, सोने-चांदी मुल्यांकनकार यांना मासिक मानधनावर दोन वर्षाकरीता मुदतवाढ देणेबाबत. |
| विषय नं.१९ | संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता कार्यान्वीत करावयाच्या संगणकीय प्रणालीच्या उपयुक्ततेबाबतचा पाहणी अहवाल. |
| विषय नं.२० | GEM Portal नोंदणीकरणाबाबतची सद्यस्थिती. |
| विषय नं.२१ | बांधकाम प्रकल्पाकरीता आर्किटेक्ट पॅनलवर आर्किटेक्ट निवडीसाठी expression of interest from donors माहिती. |
| विषय नं.२२ | सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने खराब झालेल्या रिकामे तेलातुपाचे लहान / मोठे तोंडाचे खराब व चांगले डबे विक्री करणेकामी फेर ई-निविदा मागविणेबाबत. |

| | |
|---|---|
| विषय नं.२३ | संस्थानची नावे, बोधचिन्हे, अधिकृत वेबसाईट, प्रकाशने इ.चे Trademark व CopyRight बाबतची कार्यवाही करणेकामी या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेबाबत. |
| विषय नं.२४ | संस्थान नियुक्त तांत्रिक सल्लागार M/s DSG Consultant Pvt.Ltd.Mumbai यांचे प्राप्त अभिप्रायानुसार नविन दुरध्वनी यंत्रणेचे Service/Support बाबत तांत्रिक सल्लागार व पुरवठाधारक यांचेशी समक्ष चर्चा होऊन लेखापरिक्षणाच्या दृष्टीने प्रस्तावातील मुद्दा क्र."A" ते "G" प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.२५ | ध्वनिक्षेपन यंत्रणा अद्यावतीकरणाचे निविदेसंबधीत कार्यवाही महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभाग, मुंबई यांचेमार्फत करणेऐवजी संस्थानमार्फत सदरकामी तज्ञ सल्लागाराची नेमणूक ई-निविदा पध्दतीने करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.२६ | श्री साईनाथ रुग्णालयात वाढीव खाटांसाठी व MJPJAY कार्यान्वीत करणेसाठी कर्मचारी उपलब्धता व त्यासाठीचे अंदाजे खर्चाबाबत दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णयानुसार सविस्तर खुलाशासह प्रस्ताव. |
| विषय नं.२७ | दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ चे आकृतीबंधासोबतच्या मंजूर परिशिष्ट "अ" मध्ये नमूद असलेल्या वेतनश्रेणीनुसार संस्थान आस्थापनेवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने घेणेत आलेले कंत्राटी कर्मचारी यांचा वेतन मिळणेबाबतचा अर्ज निर्णयास्तव. |
| विषय नं.२८ | श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाकामी नियमावली व समिती गठीत करणेबाबत. |
| विषय नं.२९ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील रिक्त पदावर Ad-hoc पध्दतीने निदेशक नेमणूक करणेबाबत. |
| विषय नं.३० | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ इयत्ता १ ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९(RTE Act-2009) अन्वये इयत्ता १ ली चे एकुण १७६ नवीन प्रवेशानुसार २५% प्रमाणे ५९ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.३१ | साईभक्तांना देण्यात येणा-या कॉट/लॉकर्स व अनुषंगीक सेवा पुरविण्याचे सेवा आकारामध्ये वाढ करणेबाबत. |
| विषय नं.३२ | संस्थान मालकीचे विविध ठिकाणचे जागा / गाळे शासकीय कार्यालय/ खाजगी व्यक्ती / सोसायटी यांना भाडेतत्वावर दिलेल्या मिळकतींचे शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे निश्चित करणेबाबत प्रथम सर्व करारनामे नोटराईज करुन घेणेकामीचा निर्णय होणेबाबत. |
| विषय नं.३३ | श्री. शरद कचरु गोडगे, मदतनीस, बांधकाम विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत. |
| विषय नं.३४ | श्री. शेखर विजय कुलकर्णी, सेवा निलंबीत सीसीटीव्ही ऑपरेटर, सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत. |
| विषय नं.३५ | सर्व न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने बाजू मांडणेकरीता वरिष्ठ वकिलांचे पॅनल तयार करणेसाठी पात्र अर्जदारांच्या मुलाखती घेणेबाबत. |
| विषय नं.३६ | श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुलै-२०२२ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६२,३२,३५५/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.३७ | श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुलै-२०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.६०,३७,०७४/-च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत या विषयावर दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५५८ प्रमाणे चर्चा करणे. |
| विषय नं.३८ | श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑगस्ट-२०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.९३,७७,७२०/-च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत या विषयावर दि.०२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५५८, ५५९ प्रमाणे चर्चा करणे. |

| | |
|---|---|
| विषय नं.३९ | माहे जून-२०२२ ते ऑगस्ट-२०२२ जमा खर्च तक्त्यास (दि.२/११/२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५६९ चे अनुशंषाने) मान्यता घेणेबाबत. |
| विषय नं.४० | संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना सेवा रजा विनियम–२०१३ नुसार रजा, सुट्टया लागू केलेबाबत. |
| विषय नं.४१ | संस्थान वाहनांसाठी, विद्युत जनित्रे तसेच इतर विभागांना लागणारे इंधनाची झालेली खरेदीची माहिती सादर. |
| विषय नं.४२ | संस्थानला माहे डीसेंबर-२०२१ ते जुन-२०२२ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालाबाबत. |
| विषय नं.४३ | पुर्वीचे ठेक्याची मुदत माहे मार्च-२०२३ मध्ये संपुष्टात येत असल्याने, सन २०२३-२४ करीता पुर्व तयारी करणेचे दृष्टीने मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देणेकामी उक्त्या मजुरी दराची अंदाजे रक्कम रु.२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.४४ | बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभाल कामी वार्षिक CAMC कंत्राट देणेबाबत. |
| निर्णय क्र.६०२ | उपरोक्त विषय नं.४ ते ४४ वेळेअभावी तहकुब ठेवण्यात आले. सदर तहकुब ठेवण्यात आलेल्या विषयांसाठी तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.२२.११.२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईसभागृह येथे आयोजीत करण्यात यावी, असे ठरले. |

---

**वरील निर्णय क्र. ५९९ ते ६०२ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ.१.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(राहूल जाधव)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सदस्य,तदर्थ (Ad-hoc) समिती**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

स्वाक्षरीत/-
**(डॉ.राजेंद्र भोसले,भा.प्र.से)**
**जिल्हाधिकारी अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**